Office of
**The Chief Engineer**
**Maharashtra State Load Dispatch Centre**
Thane-Belapur Road, Airoli
Navi Mumbai-400 708 ( INDIA )
*(ISO 9001-2000 certified unit of Mahatransco)*
**Phone –** (022) **(O)** 2760 1931 **(P)** 2760 1762 **Fax- (022)** 2760 1769/2760 2936
E mail – cesldc@mahasldc.in URL-www.mahatransco.in/www.mahasldc.in

---

# कार्यकारी सारांश

महाराष्ट्र विद्युत मियामक आयोगाच्या पारेषण मुक्त प्रवेशाच्या नियमाच्या कलम १८.९ नुसार आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये आर्थिक वर्षे २०१३-२०१५ प्रत्यक्ष खर्चावर आणि डिसेंबर २०१४ पर्यन्त होणा-या खर्चावर आधारीत अंदाजपत्रक महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र (म.रा.भा.प्रे.कें.)सादर करीत आहे. तसेच नियमांमध्ये आलेल्या तरतुदीनुसार आर्थिक वर्ष २०१५ -१६ मध्ये लागणा-या एकंदरीत खर्चाची निश्चिती करण्याकरीता सुधारीत तात्पुरते अंदाजपत्रक सादर करीत आहे.

**महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे अंदाजपत्रक**

महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने लेखा परीक्षणाच्या आधारे १ एप्रिल २०१३ ते मार्च २०१४ पर्यन्त झालेला प्रत्यक्ष खर्च दिलेला आहे. आर्थिक वर्ष २०१४-१५ चा अंदाजित खर्च डिसेंबर १४ पर्यन्त झालेला खर्च व उरलेल्या सहा महिन्यांचा खर्च मागील प्रथेवर आधारीत प्रक्षेपित करुन काढला आहे. आर्थिक वर्ष २०१५ - १६ चा अनुमानित खर्च वरील तत्वार केलेला आहे.

क संचालन व सुव्यवस्था वरचा खर्च हा आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या प्रत्यक्ष खर्चावर आधारीत आहे.कर्मचारी खर्च हा मंजूर पदे आणि महागाई भत्ता विचारात घेवून अनुमानित केलेला आहे आणि व्यवस्थापकीय व सामान्य खर्च हा ८.२६ टक्के दराने मा. नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या उत्तरोत्तर वाढत जाणा-या दराने प्रक्षेपित केला आहे. दुरुस्ती व देखभालीचा खर्च हा योजलेल्या कामाचे अपुषंगाने आहे.

ख महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचा सुधारीत भांडवली खर्च आर्थिक वर्ष २०१४-१५ करीता रु.२०५२.१८ लाख असून आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता रु. ८८९ लाख आहे.

ग घसारा हा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या ( दरपत्रकाच्या अटी व शर्थी ) नियम २००५ आर्थिक वर्ष २०१३-१४,२०१४-१५ आणि २०१५-१६ बहु वार्षिक दर साठीच्या अटी आणि दर अटी विनियम २०११ मध्ये ठरवून दिलेल्या दराप्रमाणे लागू आहे.

घ दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज थकीत कर्ज व भांडवली कामाकरीता घेतलेल्या नवीन कर्जावर प्रक्षेपित केले आहे.

च खेळते भांडवलावरील व्याज हे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या (दरपत्रकाच्या अटी व शर्थी ) नियम २००५ आर्थिक वर्ष २०१३-१४,२०१४-१५ आणि २०१५-१६ बहु वार्षिक दर साठीच्या अटी आणि दर अटी विनियम २०११ मध्ये नमुना घालून दिलेल्या दराप्रमाणे काढले आहे.

छ	महाराष्ट्र राज्य गुंतवणुकीवरील परतावा हा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या (दरपत्रकाच्या अटी व शर्थी )नियम २००५ आर्थिक वर्ष २०१३-१४,२०१४-१५ आणि २०१५-१६ बहु वार्षिक दर साठीच्या अटी आणि दर अटी विनियम २०११ मध्ये ठरवून दिलेल्या १५.५ टक्के प्रमाणे प्रक्षेपित केला आहे.

झ	इतर मिळकत मागील तत्वावर प्रक्षेपित केली आहे.

**अ) महसूल विवरण विविध स्त्रोताद्वारे (आर्थिक वर्ष २०१३-१४ व २०१४-१५)** (रु.लाख)

| तपशील | आर्थिक वर्ष २०१३-१४ | | | आर्थिक वर्ष २०१४-१५ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मंजूर | प्रत्यक्ष | अंतिम समायोजना करीता फरक | मंजूर | प्रत्यक्ष (डिसेंबर २०१४ पर्यन्त) | अंदाजित (जानेवारी २०१५ – मार्च २०१५) | एकूण | प्रायोबिक समायोजना करीता फरक |
| | अ | भ | अ-ब | अ | ब | क | ड | |
| | | | | | | | (ब +क) | (अ-ड) |
| एसएलडीसी शुल्क व प्रभार | २५६३.१५ | २५६३.१० | ० | ३२६५.२५ | ३१५२.१२ | ११३.१३ | ३२६५.२५ | ० |
| महाराष्ट्र शासनाचे सहाय्य व अनुदान | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| शेडयुलिंग चार्जेस | ३२६.२५ | ४८३.०९ | (१५६.८४) | ० | ७६०.८२ | २५३.६१ | १०१४.४२ | (१०१४.४२) |
| रिशेडयुलिंग चार्जेस | ७४.११ | १२१.१७ | (४७.०६) | ० | १२२.१६ | ४०.७२ | १६२.८८ | (१६२.८८) |
| इतर मिळकती व आवक | ८.८९ | २१.८८ | (१२.९९) | ० | १८.५१ | ६.१७ | २४.६८ | (२४.६८) |
| एकूण बेरीज | २९७२.३९ | ३१८९.२४ | (२१६.८५) | ३२६५.२५ | ४०५३.६० | ४१३.६२ | ४४६७.२३ | (१२०१.९७) |

भार प्रेषण केंद्राचे अंदाज पत्रक हे वरील खर्च आणि भांडवली परतावा.

**ब) संचालन किंमत अंदाज** **रु. लाख**

| अ. क्र. | तपशील | मागील आर्थिक वर्ष २०१३-१४ | | चालू आर्थिक वर्ष २०१४-१५ | | येणारे वार्षिक वर्ष २०१५-१६ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | समायोजन (केस नं.१७८/ २०१३) | लेखा परिक्षित | मंजूर (केस नं. १७८/२०१३) | सुधारीत अंदाजपत्रक | अंदाजित |
| १ | कर्मचा-यांवरील खर्च | १०७०.१० | ११५६.६६ | १५९४.१४ | १५८९.६७ | १६१९.६८ |
| २ | सामान्य प्रशासन खर्च | ४५३.०७ | ४१९.४३ | ५४८.१५ | ४६५.२८ | ५७६.८८ |
| ३ | दुरुस्ती व सुव्यवस्था खर्च | १६४.२५ | ११४.०८ | १७५.८६ | १७५.८६ | २७८.९५ |
| ४ | वापरातील भांडवलावरील व्याज | ७५.७९ | ७२.६० | ९५.७२ | ९४.३० | १०४.२४ |
| ५ | आरएलडीसी शुल्क व प्रसार | ६०२.९३ | ६०२.०० | ६०२.९३ | ६३४.२० | ६४६.८९ |
| | **उपबेरीज** | **२४६६.१४** | **२४३६.७६** | **३०१६.८०** | **२९५९.३२** | **३२२६.६५** |

**क) भांडवली खर्चाचा अंदाज** **रु. लाख**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | घसारा | ३६९.८५ | २४२.७७ | ४६१.२० | ४९१.७२ | ५६८.५६ |
| ७ | व्याज खर्च | २३८.४८ | २९८.१९ | ३७४.४६ | ३२७.४७ | ४३७.१४ |
| ८ | भांडवलीवरील परतावा | १५०.३० | १४१.३५ | २४०.५० | १९९.२३ | २७९.७७ |
| | **उपबेरीज** | **७५८.६३** | **६८२.३०** | **१०७६.१६** | **१०१८.४२** | **१२८५.४७** |
| | **एकूण अंदाज** | **३२२४.७७** | **३११९.०६** | **४०९२.९६** | **३९७७.७४** | **४५१२.१२** |

त्यामुळे महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे अनुमानित अंदाजपत्रक आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी रुपये ४५१२.१२ लाख असल्याचे अंदाज आहे.

आर्थिक वर्ष २०१३-१४ चे प्रत्यक्ष व २०१४ - १५ चे अनुमनित खर्चावर आधारीत तात्पुरते समायोजन केल्यानंतर महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचा महसूल खालील प्रमाणे राहील.

## आर्थिक वर्ष २०१५-१६ वर्षाच्या अंदाजपत्रकाचा सारांश

| रु. लाख | एकूण |
|---|---|
| संचालन किंमत अंदाज | |
| कर्मचा-यांवरील खर्च | १६१९.६८ |
| सामान्य प्रशासन खर्च | ५७६.८८ |
| दुरुस्ती व सुव्यवस्था खर्च | २७८.९५ |
| वापरातील भांडवलावरील व्याज | १०४.२४ |
| प्रादेशिक भा.प्रे.के.चे शुल्क | ६४६.८९ |
| **उपबेरीज** | **३२२.६५** |
| आर्थिक वर्ष २०१३-१४(तात्पुरते समायोजन) | (१२५९.४५) |
| आर्थिक वर्ष २०१२-१३(समायोजन) | (२४६.२३) |
| क) एकंदरीत संचलन किंमत | १७२०.९७ |
| भांडवली खर्चाचा अंदाज | |
| घसारा | ५६८.५६ |
| व्याज खर्च | ४३७.१४ |
| भांडवलीवरील परतावा | २७९.७७ |
| **उपबेरीज** | **१२८५.४७** |
| आर्थिक वर्ष २०१३-१४(तात्पुरते समायोजन) | (५७.७४) |
| आर्थिक वर्ष २०१२-१३(समायोजन) | (७६.३३) |
| **ख) एकंदरीत भांडवली खर्च** | **११५१.४०** |
| **एकूण अंदाजित खर्च** | **२८७२.३७** |

महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राची आर्थिक वर्ष २०१५- १६ करीता निव्वळ शुल्क व प्रभार वसूली

| अ.क्र. | तपशील | (रु. लाख) |
|---|---|---|
| १ | भार प्रेषण केंद्राचे आर्थिक वर्ष २०१५-१६ करीता एकूण अंदाज पत्रक | **४५१२.१२** |
| २ | आर्थिक वर्ष २०१३-१४ करीता पुढे आणलेली महसूली तूट/आधिक्य | **(३२२.५६)** |
| ३ | आर्थिक वर्ष २०१४-१५ करीता पुढे आणलेली महसूली तूट/आधिक्य | **(१३१७.१९)** |
| ४ | **निव्वळ बेरीज (१+२+३)** | **२८७२.३७** |

आयोगाच्या निर्देशानुसार केस नं. १७८/२०१३ महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे अंदाजपत्रिय खर्च रु.२८७२.३७ लाख हा वितरण परवानाधारकांकडून हा त्यांच्या जानेवारी २०१४ ते डिसेंबर २०१४ च्या योगायोग आणि ना योगायोगाचा महत्तम मागणीच्या सरासरी प्रमाणात घेण्यात येईल. मागणी खालील प्रमाणे प्रस्तावित केली आहे.

मासिक चालू शुल्क (आर्थिक वर्ष २०१५-२०१६)

(रु. लाख)

| परवानाधारक | सरासरी घटना सर्वोच्च मागणी आणि गैर योगायोगाची सर्वोच्च मागणी | प्रमाणित भाग ( / ) | अर्ध वार्षिक भार प्रेषण केंद्र शुल्क | मासिक चालू शुल्क |
|---|---|---|---|---|
| महावितरण | १५२९५ | ८३.०८ | ४७८.२७ | १९८.८६ |
| टाटा पॉवर कंपनी | ९४२ | ५.१२ | २९.४५ | १२.२५ |
| रिलायन्स | १३३२ | ७.२४ | ४१.६७ | १७.३२ |
| बेस्ट | ८४१ | ४.५७ | २६.३१ | १०.९४ |
| एकण | १८४१० | १००.०० | ५७५.१० | २३९.३६ |

इतर राज्य भार प्रेषण केंद्रांच्या आकारणी दर लक्षात घेता तो आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी खालील शुल्क मंजूर करण्याचे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रचलित दर (रु. मध्ये) | सुधारीत दर (रु.मध्ये ) |
|---|---|---|---|
| १ | नोंदणी शुल्क | रु.२०,०००/- प्रत्येक जोडणीसाठी | रु.२०,०००/- प्रत्येक जोडणीसाठी |
| २ | शेडयुलिंग चार्जेस | रु.३,०००/- प्रत्येक दिवसाला | रु.३,०००/- प्रत्येक दिवसाला |
| ३ | रिशेडयुलिंग चार्जेस | रु.३,०००/- प्रत्येक आवृत्ती | रु.३,०००/- प्रत्येक आवृत्ती |
| ४ | एसटीओए अर्ज शुल्क | रु.७,५००/- प्रत्येक अर्जासाठी | रु.१०,०००/- प्रत्येक अर्जासाठी |

# - प्रार्थना -

अर्जदार सविनय प्रार्थना करतो की आयोगाने

क  महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र संचलनाचे आर्थिक वर्ष २०१५-१६, समायोजन आर्थिक वर्ष २०१३-१४ करीता आणि वार्षिक कामगिरी पुनरावलोकन २०१४-१५ करीता चे सुधारीत अंदाजपत्रक विचारात घ्यावे व त्यास मान्यता द्यावी.

ख  महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र शुल्क व प्रभार योग्य वाटेल तसे मंजूर करावे.

ग  म.रा.भा.प्रे.केंद्राच्या अंदाजपत्रक दावा आदेश केस क्र. १७८ दि. ०७ मार्च २०१४ मध्ये मंजूर केल्याप्रमाणे शेडयुलिंग प्रभार, रिशेडयुलिंग प्रभार, नोंदणी शुल्क, प्रक्रीया शुल्क, आणि विलंब आकार पूर्वीप्रमाणे सुरु ठेवण्यात यावेत.

घ)  उर्जा मंत्रालयाने नेमलेल्या टास्क फोर्सच्या शिफारशीप्रमाणे शेडयुलिंग प्रभार, रिशेडयुलिंग प्रभार, नोंदणी शुल्क आणि प्रक्रीया शुल्क यांचे महसूली उत्पन्न म.रा.भा.प्रे.केंद्राकडे अधिक्य आणि राखीव निधीच्या स्वरुपात ठेवावे जे अतिरिक्त निधी म्हणून पुढील भांडवली खर्चाकरीता उपयोगात आणता येईल.

सदर प्रकरणाच्या बाबी आणि संदर्भ यांच्या अनुषंगाने योग्य आणि तत्सम आदेश देण्यात यावेत.

सही/-

ठिकाण : ऐरोली नवी मुंबई  (संजय श्रीकृष्ण कुलकर्णी)

दिनांक : ११ मे २०१५  मुख्य अभियंता, (महाराष्ट्र भार प्रेषण केंद्र)